# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधीक्षक कार्यालय नागपूर

दिनांक २६/०५/२०२१ (बुधवार )

## –: खुन :–

पो.टे.खापा :– अंतर्गत ०७ किमी अंतरवरील मौजा वाकोडी येथे राहणाऱ्या भजन मेहताब कवरेती वय ४० वर्ष रा वाकोडी. ढिवरा मोहल्ला यांनी दिनांक २५/०५/२०२१ चे रात्री २१/०० ते २२.०० वा दरम्यान त्याला दारू पिण्यास त्याची पत्नी सौ. मथुरा भजन कवरेती वय ३२ वर्ष रा. वाकोडी हिने पैसे देण्यास नकार दिल्याने त्यासोबत भांडण करण्यास सुरुवात केली, तसेच भजन मेहताब कवरेती याला मुलगा नाही तर मुलगी पाहिजे होती या कारणावरून चिडुन जावूण त्यांने आपल्या स्वत:चा मुलगा सत्यम कवरेती वय १ वर्ष यास त्याच्या पायाला धरून अंगनातील दगडावर क्रुरतेने आपटुन जिवानीशी ठार केले.

सदर प्रकरणी फिर्यादी सौ मथुरा भजन कवरेती वय ३२ वर्ष रा वाकोडी रा. ढिवरा मोहल्ला वाकोडी ता.सावनेर चे तोंडी रिपोर्ट वरुन आरोपी भजन मेहताब कवरेती वय ४० वर्ष रा वाकोडी ता. सावनेर चे विरुध्द पो.स्टे. खापा येथे अप क्रमांक १४७/२०२१ कलम ३०२ भादवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून आरोपी भजन मेहताब कवरेती वय ४० वर्ष रा वाकोडी ता. सावनेर ला अटक करण्यात आली असून पुढील तपास पोनी अजय मानकर पोलीस स्टेशन खापा मो. नं. ९४२२९४२७६४ हे करीत आहे.

## जनावरांना कत्तलीसाठी घेवून जाणाऱ्या ५ वाहनामधुन एकूण ५५ जनावर (गाय, गोरे, म्हेशी, हेले) ची सुटका एकुण एकूण रुपये २९,४४०००/– चा मुद्येमाल जप्त मौदा पोलीसांची कार्यवाही

दिनांक २५.०५.२०२१ रोजी पोलीस स्टेशन मौदा चे पथक रात्रगस्त करित असतांना त्यांना माहिती मिळाली की वदोडा शिवारात काही वाहनामध्ये जनावर कत्तलीसाठी घेवून जाणार आहे या माहिती वरुन नमुद ठिकाणी पथकानी धाड टाकली असता पोलीसांना पाहून वाहन चालक आपल्या ताब्यातील वाहने मोक्यावर सोडून फरार झाले सदर ठिकाणी १) आयसर वाहन क्र. एम.एच.३५ ए.जे १६७७ २) पीकप झेनॉन वाहन क्र. एम.एच.३० बी.डी. ३८६३, ३) बोलेरो पिकअॅप वाहन क्र.एम.एच.३५ ए.जे ०९४३,४) पिक्प वाहन क्र एम. एच.४० ए.टी ०९६५, ५) पिक्प वाहन क्र एम.एच.३५ ए.जे १५२४ मध्ये या ५ वाहनामघ्ये अवैधरित्या जनावराच्या तोंडाला, पायाला, शिंगाला दोरीने बांधून कोंबलेल्या स्थितीत कोणत्याही चारा पाण्याची व्यवस्था न

करता एकूण ५५ जनावर (४३ गायगोरे, १२म्हेशी, हल्ले) कोंबलेल्या स्थितीत मिळून आले. जनावरांची एकूण किमत २,४४,०००/— रूपये, पाच वाहन एकूण कि. २७,००००० असा एकूण किमती रुपये २९,४४०००/— चा मुद्येमाल जप्त फरार झालेले वाहनाचालका विरुध्द पोलीस स्टेशन मौदा येथे अप क्र. २६६/२०२१ कलम ११,(१), ई.ड.च ज.छ.स.क ५, १,५ब, ९ म.प्राणि.संर. का. स.क ८३,१७७ ३४ भादवी दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोउपनि आगासे मो.क्र.९१३०००१७१५ हे करित आहेत.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणिकर, उप विभागीय पोलीस अधिकारी कन्हान विभाग श्री. मुख्तार बागवान, यांचे मार्गदर्शनात वरिष्ठ पोलीस निरीक्षक हेमंतकुमार खराबे, सफौ शामनाथ चौधरी, पोहवा मनोहर जंगवार, पोशि उमेश माहुर्ले, शिवाजी नागरे, जितेन्द्र बोरकर यांनी पार पाडली.

**—: चोरी (मोटार सायकल ) :—**

**पो.स्टे. मौदा** :— अंतर्गत १८ किमी अंतरावरील महालगाव शिवारात रत्नाराम मुलाराम जाठ वय २४ वर्षे रा चौहटत जि.बाडनेर राजस्थान हे चौधरी फेट कॅरयिर च्या नावाने ट्रॉन्सपोट, पेड पार्किग महालगाव मध्ये गाडी चालवतो गाडीचा मालकच्या नावावर स्पलेडर गाडी क्र. एमएच—४० बीव्ही— ३१९८ ही आहे ही गाडी पारधी पेट्रालेपंप च्या बाजूला पेड पार्किग ऑफिस समोर दिनांक १६.०५.२०२१ रोजी वा. उभे करुन आपल्या गावाला गेला असता त्यांना त्याचे मित्राचा फोन आला कि त्याची गाडी दिसत नाही.

सदर प्रकरणी फिर्यादी रत्नाराम मुलाराम जाट वय २४ वर्षे रा. चौहटत जि.बाडनेर राजस्थान चे तोंडी रिपोर्ट वरुन अज्ञात आरोपी विरुध्द पो.स्टे. मौदा येथे कलम ३७९ भादंवि भा.दं.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास पो.हवा प्रशांत काळे मो.नं. ९८२२५४९६९५हे करीत आहे.

**—: चोरी (शासकीय संपत्ती ) :—**

**पो.स्टे. कोंढाळी** :— अंतर्गत १५ किमी अंतरावरील इकोनोमिक्स कंपनी ते सावंगा गावातील रोडवरील लोंखडी पोलवर चे सौरउर्जेचे ५ स्ट्रिट लाइट प्रत्येकि कि. २००० प्रमाने एकुन १०,००० रू चा माल कोणीतरी अज्ञात इसमांनी चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी प्रविण नेमाजी पानपत्ते वय ४४ वर्ष रा. सावंगा चे तोंडी रिपोर्ट वरुन अज्ञात आरोपी विरुध्द पो.स्टे. कोंढाळी येथे कलम ३७९ भादंवि भा.दं.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास पोहवा तांदुळकर मो क्र. ७२१८२८७१७९ हे करीत आहे.

## —: चोरी (जनावरे ) :—

**पो.स्टे. सावनेर** :— अंतर्गत ७ किमी अंतरावरील मौजा निळगाव शिवार कळमेश्वर येथे अशोक मुकुंदराव धोटे राकृनिळगाव, तह— सावनेर जिल्हा नागपुर यांनी आपल्या शेतातील कोठयाच्या बाहेर बांधलेल्या एक भुऱ्या रंगाची जर्सी कारवड किमंती ८००० रु व एक काळया रंगाची जर्सी कारवड किमंती ८००० रु तसेच शेतातील मांडवात बांधलेली भुऱ्या रंगाची जर्सी कारवड किमंती ५००० अशा एकूण किमंती २१००० रु च्या कारवडी कोणीतरी अज्ञान इसमांनी दिनांक २५/५/२१ चे सकाळी ०५/०० वा सुमारास चोरुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी अशोक मुकुंदराव धोटे वय ६१ रा. निळगाव, तह— सावनेर जिल्हा नागपुर चे तोंडी रिपोर्ट वरुन अज्ञात आरोपी विरुध्द पो.स्टे. सावनेर येथे कलम ३७९ भादंवि भा.दं.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास साफौ तिवारी मो.क्र. ९८२२५ ४५१६९ हे करीत आहे.

## —: चोरी (कोळसा खदान साहीत्य ) :—

**पो.स्टे. पारशिवनी** :— अंतर्गत ८ किमी अंतरावरील मौजा सिंगोरी ओपन कास्ट खदान येथून दिनांक २२/५/२०२१ चे २३/०० ते २३/३० वा दरम्यान मोसा. क्र. एम एच ४९ बि.जे २८५२ व मो.सा. क्र. एम.एच ४० डि. ७१५४ ने आलेल्या दोन अज्ञात इसमांनी सिंगोरी ओपन कास्ट खदान येथिल पंप हाउस जवळिल अंदाजे १० मिटर आर्मर केबल किमती १०,००० रू कापुन चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी रविकांत रामदास कंडे वय ४२ रा. चनकापुर कॉलोनी कॉटर न. २६/१ सावनेर चे तोंडी रिपोर्ट वरुन आरोपी मोसा. क्र. एम एच ४९ बि.जे २८५२ व मो.सा. क्र. एम.एच ४० डि. ७१५४ चे चालकाविरुध्द पो.स्टे. पारशिवनी येथे कलम ३७९ भादंवि भा.दं.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास पोहवा प्रभाकर झोड मो.क्र.८८०६३५३४४६ हे करीत आहे.

## —: हयगयी ने मृत्यु :—

**पो.स्टे. काटोल** :— अंतर्गत ९ किमी अंतरावरील परसोडी शिवारात दिनांक २५/०५/२०२१ चे ०८/३० ते ०८/४० वा दरम्यान मयुर लक्ष्मणराव गुजर वय ३७ वर्ष रा. सिंघानिया नगर यवतमाळ हा आपली हुंडई ईको क्रमांक एम.एच.२९ ए आर ४२५१ नी परीवारासह काटोलकडे येत असता त्याचा मुलगा नामे अजिक्य उर्फे **श्रेयांनश मयुर गुजर वय दीड वर्ष** याला चिप्सचे पॅकेट देत असता आरोपीचे गाडीवरील नियंत्रण सुटल्याने गाडी हे सागाच्या झाडाला धडकल्याने **अजिक्य उर्फे श्रेयांनश मयुर गुजर** हा गाडीतुन बाहेर पडल्याने त्यांचे डोक्याला गंभीर जखम झाल्याने जागीच मरण पावला. मयुर लक्ष्मणराव गुजर वय ३७ वर्ष रा. सिंघानिया नगर यवतमाळ यांनी आपली ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे गाडी चालवुन अजिक्य उर्फे श्रेयांनश मयुर गुजर याचे मरणास कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी फिर्यादी पोहवा/५७५ समर्थ कोडापे पो स्टे काटोल चे लेखी रिपोर्ट वरुन आरोपी मयुर लक्ष्मणराव गुजर वय ३७ वर्ष रा. सिंघानिया नगर यवतमाळ चे विरुध्द पो.स्टे.काटोल येथे कलम २७९, ३०४ (अ) भादवी सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास पोउपनि प्रशांत लभाणे मो नं. ९८२३४३३८६३ हे करीत आहे.

## —: पळवुन नेणे :—

**पो.स्टे. बोरी** :— पो.स्टे. बोरी येथे दिनांक २५/०५/२०२१ रोजी फिर्यादी ने येवून तोंडी तक्रार नोंदविली की, तिची अल्पवयीन १६ वर्षाची लहान मुलगी सकाळी ०६.०० वा सुमारास घरी न दिसल्याने तिचा शोध घेतला असता ती मिळुन न आल्याने तीला कोणीतरी अज्ञात आरोपीने अज्ञात कारणाने फुस लावुन पळवुन नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी चे तोंडी रिपोर्ट वरुन अज्ञात आरोपी विरुध्द पो.स्टे. बोरी येथे कलम ३६३ भादवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोउपनी भारती मो क्र.८३२९३०६१७८ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपूर**